CIN : L99999MH1983PLC029321
Viksit Engineering Limited
Regd. Office : Room No. 1-2, Kapadia Chambers, 51, Bharuch Street,
Masjid Bunder (E) Mumbai - (MH.) - 400 009
Ph. : (022) 66150223, E-mail : investor_viksit@yahoo.in, Website : www.viksit.in

December 13, 2023
Ref No.: VEL/SEC/2023-24

To,

Corporate Relationship Department,

BSE Limited

1st Floor, New Trading Ring,

Rotunda Building, P J Towers,

Dalal Street, Fort,

Mumbai– 400001.

Sub: Corporate Insolvency resolution Process – Copy of Public Announcements published in Newspaper.

Ref: Intimation under Regulations 30 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI LODR').

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 read with sub clause 16(d) of Para A of Part A of Schedule III of the SEBI LODR, please find enclosed herewith a copy of the public announcement made by the Interim Resolution Professional, Shri Dinesh Kumar Deora in Form A under Section 13 of the Insolvency and Bankruptcy Code, 2016 read with Regulation 6(2) of the Insolvency and Bankruptcy (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016, as published in the newspapers.

You are requested to kindly take the same on record and acknowledge the receipt.

Thanking you,

Yours sincerely,

For Viksit Engineering Limited

Ckhatri

Chandni Khatri
Company Secretary
Membership No: ACS-67132

Encl: as above

सुख शांती समाधान

आताच दिवाळी झाली ना... पुन्हा देवदिवाळी कोणती? हा प्रश्न तुम्हाला पडला असणार ना. पण आपण जेव्हा अश्विन-कार्तिक महिन्यांमध्ये दिवाळी साजरी करतो, तेव्हा चार्तुमास सुरू असतो. भगवान विष्णू निद्रावस्थेत असतात. कार्तिक शुक्ल एकादशीला ते जागे होतात. त्यावेळी चार्तुमासही संपतो. म्हणून मार्गशीर्ष महिन्यात ही खास देवांची दिवाळी साजरी केली जाते. त्यानिमित्ताने सर्व देवदेवतांचे स्मरण हा देवदिवाळी सणाचा हेतू असतो.

देवदिवाळी अशी साजरी करा...

देव कोणकोणते? आपल्याकडे तेहेतीस कोटी देव अशी संकल्पना आहे. यात कोटी हा शब्द मराठीत नसून संस्कृतातील आहे. संस्कृत भाषेत कोटी शब्दाचा अर्थ प्रकार असा आहे. ईश्वराने निसर्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी ३३ देवांना कार्यभार सोपवला. त्यांच्यात ८ वसू, ११ रूद्र, १२ आदीत्य, १ इंद्र आणि १ प्रजापती असे पाच स्तर आहेत. प्रत्येकाचे कार्य (खाते) भिन्न असल्याने प्रत्येकाला वेगवेगळे प्रकार सोपवण्यात आले. असे एकूण ३३ प्रकार झाले, त्याला तेहेतीस कोटी देव संबोधण्यात आले. अशा सर्व देवांचे स्मरण म्हणजे देवदिवाळी! कोकणात मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो.

अशी साजरी करतात देवदिवाळी - या दिवशी देव्हाऱ्यात तेलातुपाचे दिवे लावून ठेवावेत. देव्हाऱ्यातील देवांना पंचामृताचा अभिषेक करून अत्तर लावून गरम पाण्याने स्नान घालावे. या दिवशी घरातील कुलदेवता व इष्टदेवता यांच्याखेरीज स्थानदेवता, वास्तुदेवता, ग्रामदेवता आणि गावातील अन्य देवता. उदा. महापुरुष, वेतोबा, उपदेवता यांना त्यांच्या मानाचा भाग अर्थात नैवेद्य दाखवला जातो. या सर्व देवदेवतांची वर्षातून आपल्याकडून एखादे दिवशी पूजा होऊन त्यांना नैवेद्य अर्पण होणे आवश्यक असते.

देवदीपावलीत आपापल्या प्रथेनुसार नेहमीच्या पदार्थांखेरीज ताटात पुरणाचे कडबू, वडे, वरण, भात आणि दिवाळीतील फराळातील काही पदार्थ नैवेद्यात दाखविले जातात. काही ठिकाणी रात्री देवांची वाजतगाजत पालखी मिरवणूक काढली जाते. यानिमित्ताने पै-पाहुण्यांनीही आमंत्रित केले जाते. त्यांना जेऊ घातले जाते. देवदीपावलीच्या निमित्ताने घरातील, गावातील व घराण्यात पूर्वापार चालत आलेल्या सर्व देवतांचा उल्लेख करून त्यांचा आदरसत्कार देवदीपावलीला केला जातो.

मार्गशीर्षातल्या गुरूवारी घटाच्या स्वरूपात महालक्ष्मीची पूजा केली जाते. घटाला आकर्षक स्वरूपात सजावट केली जाते आणि मनोभावे पूजा अर्चा करून कुटुंबाला समाधान, शांती, ऐश्वर्य मिळावे, अशी प्रार्थना केली जाते. शेवटच्या गुरूवारी व्रताचे उद्यापन केले जाते.

प्रत्येक महिन्याला वेगळे असे महत्त्व असते. त्याचप्रमाणे मार्गशीर्ष महिन्याला खूप महत्त्व आहे. ज्याप्रमाणे श्रावण महिना भगवान शंकराला समर्पित केला जातो, त्याचप्रमाणे मार्गशीर्ष महिन्यात लक्ष्मीची पूजा केली जाते. मार्गशीर्ष महिना हा हिंदू कॅलेंडरमधला नववा महिना आहे. हा महिना आला की सर्व महिलावर्गाला उत्सुकता असते ती पहिला मार्गशीर्ष गुरुवार केव्हा आहे. या महिन्यात बाजारात गेले तरी आपल्याला बहुतेक ठिकाणी देवी लक्ष्मीच्या गुरुवार व्रताचे साहित्य पाहायला मिळेल. गुरुवारी तर बाजारात हे साहित्य घेण्यासाठी महिलांची झुंबड उडालेली असते. या महिन्याच्या प्रत्येक गुरुवारी देवी लक्ष्मीचे व्रत केले जाते, विशेष पूजा देखील केली जाते. देशातल्या अनेक राज्यात अनेक स्त्रिया आणि कुमारिका घरात सुखशांती आणि भरभराट नांदावी यासाठी न चुकता हे व्रत मोठ्या श्रद्धेने करतात. हल्ली हे व्रत पुरुषही करू लागले आहेत. चला तर मग पाहूया या व्रत मांडणी व पूजाविधी कसा करावा ते....

मार्गशीर्ष गुरुवार व्रत पूजाविधी

मार्गशीर्ष महिन्याच्या गुरुवारी सकाळी ब्रह्म मुहूर्तावर उठून आपली नित्यकर्मे आटापून आंघोळ करावी, स्वच्छ वस्त्र परिधान करावे.

घराच्या, अंगणात आणि पूजेच्या ठिकाणी रांगोळी काढावी. त्यामध्ये माता लक्ष्मीची पावले अवश्य काढावी.

पूजा करण्यापूर्वी जागा स्वच्छ करून घ्यावी, तेथे गोमुत्र शिंपडावे. रांगोळीने स्वस्तिक काढून त्यावर मधोमध चौरंग चौरंग किंवा पाट ठेवावा. चौरंगाच्या चारीबाजूला रांगोळी काढावी.

चौरंगावर लाल कपडा घालून त्यावर तांदूळ किंवा गव्हाची रास घालून त्यावर तांब्याचा कलश ठेवावा. कलशाला बाहेरून आठ बाजुला हळद-कुंकवाची आठ बोटे ओढावी. कलशात दूर्वा, पैसा आणि सुपारी घालावी. पंचपत्री, विड्याची पाने अथवा आंब्याची डहाळी कलशावर ठेवावी व त्यावर नारळ ठेवावा. त्या नारळाला देवी समजून तिला सजविले जाते. दागिने, फुलांची वेणी घातली जाते. या देवीची पूजा केली जाते. देवीभोवती आरास मांडली जाते. या व्रताचे महत्त्व सांगणारी पुस्तिका पूजेमध्ये ठेवली जाते. चौरंगावर श्री लक्ष्मीदेवीचा फोटो किंवा लक्ष्मी श्रीयंत्र ठेवावे. त्यापुढे विडा, खोबरे, खारीक, बदाम, इतर फळे, खडीसाखर किंवा गूळ ठेवावा. देवीपुढे पाच फळं, लक्ष्मी कवडी यांची मांडणी करावी. तसेच देवीपुढे पाच पानांचा विडा ठेवावा. नैवेद्य म्हणून लाह्या, गुळ, बताशे ठेवावे.

लक्ष्मीसमोर दिवा लावावा. लक्ष्मीची षोडशोपचार पूजा करावी. देवीला कमळाचे फूल अर्पित करावे. लक्ष्मी पूजनानंतर सर्व कुटुंबासमवेत श्री महालक्ष्मी व्रत कथा वाचावी आणि आरती करावी. श्री लक्ष्मी नमनाष्टक वाचावे. देवीची पूजा झाल्यानंतर मनातील इच्छा प्रकट करून प्रार्थना करावी. संध्याकाळी पुन्हा देवीची आराधना, आरती करुन गोडाच्या पदार्थासह नैवेद्य दाखवावा. गायीसाठी एक पान वेगळं काढावे. नंतर कुटुंबासह आनंदाने भोजन करावे. दुसऱ्या दिवशी कलशामधील पाणी घरात शिंपडावे आणि नंतर पाणी नदी किंवा तलावात वाहून द्यावे किंवा तुळशीच्य झाडाला घालावे. पाने घरातील चारी बाजूला ठेवून द्यावे नंतर निर्माल्यात टाकावे. यादिवशी पूजा करणाऱ्या व्यक्तीने उपवास करावा. दुध आणि फळांचे सेवन करावे, या दिवसात घरात मांसाहार करू नये. दुसऱ्या दिवशी या कलशातील विडा, फुले आणि विड्याची पाने विसर्जित करावी.

व्रतांपैकीच मार्गशीर्ष गुरुवारचे हे लक्ष्मी व्रत असून या व्रताची देवता नारायणसमेत लक्ष्मी आहे. या व्रताची सुरुवात मार्गशीर्ष मासातील पहिल्या गुरुवारी करावी व उद्यापन शेवटल्या गुरुवारी करावे. पूजा करताना आणि कहाणी वाचताना मन शांत आणि आनंदी असावं. व्रताच्या दिवशी घरातील वातावरण आनंदी असावं. पूजा करण्यात असमर्थ असल्यास एखाद्या इतर भक्ताकडून पूजा करवावी. मात्र उपास स्वतः करावा. लक्ष्मी धन संपत्ती प्राप्तीसाठी पुरुष भक्त श्रीलक्ष्मी महात्म्यचा पाठ करू शकतात.

श्रीमहालक्ष्मीची अनेक नावे, अनेक रूपे आहेत. पार्वती, सिंधुकन्या, महालक्ष्मी, लक्ष्मी, राजलक्ष्मी, गृहलक्ष्मी,सावित्री, राधिका, रासेश्वरी, चंद्रा, गिरिजा, पद्मा, मालती, सुशीला अशा विविध नावांनी श्रीमहालक्ष्मी ओळखली जाते

असे म्हणतात की जो कोणी या महिन्यात उपवास करून माता लक्ष्मीची पूजा करतो, त्याच्यावर माता लक्ष्मीची कृपा होते आणि त्याचे भांडार संपत्ती आणि धान्यांनी भरलेले असते.

अनेक राज्यांत मार्गशीर्ष महिन्याच्या गुरुवारी स्त्रिया लक्ष्मी-विष्णूची उपासना करून व्रत आणि दिवे दान करतात. यामध्ये शंखपूजेला विशेष महत्त्व आहे.

मार्गशीर्ष गुरुवार व्रत नियम

- ही पूजा शक्य तितक्या प्रातःकाळी करावी. दिवसभर उपवास करून त्यानंतर सायंकाळी महालक्ष्मीला नैवेद्य दाखवून मगच उपवास सोडावा. या व्रतात खंड पाडू नये, काही आकस्मिक अडचण आल्यास उपवास करावा पूजा मांडणी व पूजा कुटुंबातील अन्य सदस्य किंवा बाहेरील कोणी व्यक्तीकडून करून घ्यावी..

-महालक्ष्मी व्रताची कथा आवर्जून वाचावी.

असं म्हणतात, जो कोणी या व्रताचे पालन करतो त्याच्या संसारात महालक्ष्मीचा वरदहस्त टिकून परिणामी धनधान्य, समृद्धी याची वृद्धी होत राहते.

कोल्हापूरच्या वडगावात २ नवीन पक्षी

■ कोल्हापूर

हातकणंगले तालुक्यातील पेठ वडगाव येथील जुना किणी रोडवरील माळी मळा येथे दोन नवीन पक्षी आढळले आहेत. निसर्गप्रेमी निलेश घारसे हे पक्षी निरीक्षण करत असताना त्यांना कृष्ण थिरथिरा आणि काळ्या डोक्याचा कुहूआ हे दोन नवीन पक्षी दिसले.

निलेश घारसे यांनी या दोन्ही नवीन पक्ष्यांची छायाचित्रे टिपली. त्यामुळे आता वडगांवच्या पक्षी संपदेत या दोन नव्या पक्ष्यांची नोंद झाली आहे.

कृष्ण थिरथिरा हा पक्षी दिसायला शिडशिडीत यष्टीचा, सतत कार्यशील, काळा आणि नारिंगी-तपकिरी रंगाचा आहे. हिवाळ्यात हिमालयातून स्थलांतर करून भारतातील उर्वरित भागात तो येत असतो. याचे खाद्य कोळी आणि तर कीटक असतात. तर काळ्या डोक्याचा कुहुआ हा राखाडी करड्या रंगाचा, डोके, पंख आणि शेपूट काळ्या रंगाचे, खालील भाग सफेदसर असतो. गावाच्या आसपास आंबा, लिंब, चिंच, सागवान यासारखी झाडे त्यांना अधिक पसंत असतात. याचेही प्रमुख खाद्य कीटक असते.

बऱ्याच पक्ष्यांचे खाद्य पिकावर पडणारी कीड तसेच कीटक असते. त्यामुळे पक्ष्यांची कीड नियंत्रणात महत्त्वाची भूमिका असते. याचा विचार करून पक्षी संवर्धनाच्या पार्श्वभूमीवर शेताच्या बाजूला आणि घराजवळ देशी झाडे लावणे गरजेचे आहे, असे मत निसर्गप्रेमी मित्र डॉ.अमोल पाटील यांनी व्यक्त केले.

हवामान बदल निर्देशांकात भारत सातव्या क्रमांकावर

■ नवी दिल्ली

सी.सी.पी.आय. अर्थात हवामान बदल निर्देशांकात भारताने सातव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. गेल्या वर्षीच्या मानांकनात एका अंकाने वाढ होत भारत सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे. दुबईत झालेल्या जागतिक हवामान परिषदेत जाहीर केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

सलग पाचव्या वर्षी भारताने सर्वोच्च दहा मानांकनांमध्ये स्थान मिळवले आहे. जागतिक पातळीवर हरितगृह वायू उत्सर्जन आणि हवामान बदलावर मात करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या युरोपीय संघ आणि ६३ देशांच्या कामगिरीचं मूल्यमापन या निर्देशांकाच्या माध्यमातून केले जाते. प्रदूषणात आघाडीवर असलेले जपान आणि अमेरिकेसारखे देश या यादीत अनुक्रमे ५१ आणि ५७व्या क्रमांकावर आहेत. भारताने २०१४ च्या ३१ व्या मानांकनावरून २०२३मध्ये सातवे मानांकन गाठले आहे.

प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्प रद्द करा मच्छीमार बांधवांचे आमरण उपोषण

प्रकल्पासाठी पुढाकार घेणाऱ्या मंत्री कराडांचा निषेध

■ छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथील नाथसागर धरण परिसरात केंद्र व राज्य शासनाच्या वतीने प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्प तातडीने रद्द करण्यात येऊन केंद्रशासनाच्या अधीन असलेल्या एनटीपीसी कंपनीला दिलेले काम तात्काळ थांबविण्याची मागणीसाठी हजारो मच्छीमार बांधवांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. पैठण शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर उपोषण सुरु असून यात मच्छिमारांची कुटुंबेही सहभागी झाली आहेत. या प्रकल्पासाठी पुढाकार घेणारे केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांचा निषेध करून उपोषणाला प्रारंभ करण्यात आला.

नाथसागर धरण आणि परीक्षेत्र हे पक्षी अभयारण्य म्हणून १९८६ ला घोषित झाले आहे. नाथसागर परिसरात इको सेन्सिटिव्ह झोन असल्यामुळे नाथसागर पक्षी अभयारण्याभोवती पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना पर्यावरण व वन मंत्रालयाने जारी केली आहे. आता या क्षेत्रात बांधकाम, मशीन आणि विविध कृतींना बंदी घालण्यात आली आहे. या सौरऊर्जा प्रकल्पाने काही वाईट परिणाम होतील. अन्न नसल्याने स्थलांतरित पक्षी येणार नाहीत शिवाय येथील पक्ष्यांच्या अधिवासाची जागा घटून धरण परिसरातील जैवविविधता संपुष्टात येईल. दरम्यान, नाथसागर जलाशयात शेवगाव, नेवासा व स्थानिकसह जालना जिल्ह्यातील अंबड, पाथरवाला, शहागड, गांदी, राक्षसभवन येथील मच्छीमार कुटुंब उदरनिर्वाह करतात. या प्रकल्पामुळे २० हजार कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे हा प्रकल्प तातडीने रद्द

आज पुणे-लोणावळा लोकल फेऱ्या रद्द

■ पुणे

पुणे-लोणावळा उपनगरी विभागात उद्या मेगाब्लॉक घेणार असून, त्यामुळे अनेक लोकल गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, असे पुणे रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. रद्द झालेल्या अप गाड्यांमध्ये गाडी क्रमांक ०१५६२ पुणे-लोणावळा लोकल, गाडी क्रमांक ०१५६४ पुणे-लोणावळा, गाडी क्रमांक ०१५६६ पुणे- लोणावळा लोकल, गाडी क्रमांक ०१५८८ शिवाजी नगर-तळेगाव लोकल, गाडी क्रमांक ०१५६८ पुणे- लोणावळा लोकल, गाडी क्रमांक ०१५७० शिवाजीनगर - लोणावळा, या गाड्यांचा समावेश आहे.

रद्द होणाऱ्या डाऊन गाड्यांमध्ये गाडी क्रमांक ०१५५९ लोणावळा-शिवाजी नगर लोकल, गाडी क्रमांक ०१५६१ लोणावळा-पुणे लोकल, गाडी क्रमांक ०१५८९ तळेगाव-पुणे लोकल, गाडी क्रमांक ०१५६५ लोणावळा-शिवाजी नगर लोकल, गाडी क्रमांक ०१५६७ लोणावळा-शिवाजी नगर लोकल, गाडी क्रमांक०१५६९ लोणावळा-पुणे लोकल या गाड्यांचा समावेश आहे.

प्रभू रामाच्या दर्शनासाठी मीरारोडचे ३०० भक्त अयोध्येला पायी जाणार

■ ठाणे

उत्तर प्रदेशातील अयोध्येतील भव्य दिव्य अशा श्री राम मंदिराचे उद्घाटन नववर्षाच्या २२ जानेवारी रोजी होणार आहे. श्री रामाची मूर्ती विराजमान झाल्यानंतर मंदिर भक्तांसाठी खुले होणार आहे.या पार्श्वभूमीवर प्रभू रामाचे दर्शन घेण्यासाठी मीरा रोड ते अयोध्या अशी पदयात्रा मीरा भाईंदरमधील ३०० राम भक्त काढणार आहेत. उद्या रविवार १० डिसेंबर रोजी निघणाऱ्या राम भक्ताच्या या पदयात्रेस शुभेच्छा देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आमदार प्रताप सरनाईक हे उपस्थित राहणार आहेत. ४१ दिवसाचा प्रवास करून श्रीराम भक्ताची पदयात्रा २१ जानेवारीला अयोध्येत दाखल होणार आहे.

अयोध्येत प्रभू श्री रामाचे भव्य मंदिर उभे राहत आहे आणि त्यात त्यानंतर मंदिर भक्तांसाठी खुले होणार आहे तमाम रामभक्तांसाठी हा आयुष्यातील सर्वोच्च सुवर्ण क्षण असून त्यामुळे मीरा भाईंदरचे ३०० भक्त पापी अयोध्येला जाणार आहेत. या पदयात्रेसाठी लागणारा सर्व खर्च आमदार प्रताप सरनाईक करणार आहेत. उद्या १० डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता वेस्टर्न हॉटेलजवळील मंदिरातून ३०० भाविक अयोध्येकडे रवाना होणार आहेत. पहिल्या दिवशी भक्तांना शुभेच्छा देण्यासाठी मीरा रोड ते ठाणे असे २५ किलोमीटर अंतर हजारो भक्त चालून ठाण्याच्या वेशीवर पा भक्तांना पुढील पदयात्रेस शुभेच्छा देणार आहेत.त्यानंतर ठिकाणाहून ही राम भक्तांची पदयात्रा जाईल, त्यांचे शिवसेनेकडून प्रत्येक



तालुक्यात जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी स्वागत केले जाणार आहे.

दरम्यान, ३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९७ साली राम मंदिर आंदोलन सुरू होण्यापूर्वी सर्वांत पहिली चांदीची वीट शिवसेनेचे तत्कालीन ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या माध्यमातून अयोध्येला रवाना करण्यात आली होती. सव्वा किलो वजनाची ही वीट आनंद दिघे यांनी बनवुन घेतली होती. या विटेवर 'जय श्री राम 'असे लिहिले होते.

हजयात्रेसाठी कोल्हापुरात ऑनलाईन अर्जप्रक्रिया सुरू

■ कोल्हापूर

कोल्हापुरात हज यात्रा २०२४ साठी जाणाऱ्या यात्रेकरुंसाठी केंद्रीय हज कमिटी व महाराष्ट्र राज्य हज कमिटीच्या निर्देशानुसार ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला ५ डिसोंबरपासून सुरुवात झाली आहे. कोल्हापुरातील दसरा चौक येथील मुस्लिम बोर्डिंग येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

विकसित इंजिनियरिंग लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील		
१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	विकसित इंजिनियरिंग लिमिटेड
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	१६ फेब्रुवारी, १९८३
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी - मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र.	L99999MH1983PLC029321
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता, जर असल्यास	खोली क्र. १-२, कपाडिया चेंबर्स, ५१ भरुच स्ट्रीट मस्जिद बंदर (पू), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००० ९.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	०९ डिसेंबर, २०२३ (आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक) आदेश दि. ०८ डिसेंबर, २०२३ रोजी उद्घोषित
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	५ जून, २०२४
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	दिनेश कुमार देवरा IBBI/IPA-002/IP-N00958/2020-2021/13041
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	बी-२०२, एबीटी अपार्टमेन्ट, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), नवजीवन स्कुलजवळ, मुंबई उपनगर, महाराष्ट्र - ४०००९७. ईमेलः dinesh.deora@yahoo.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासोबत पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	बी-२०२, एबीटी अपार्टमेन्ट, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), नवजीवन स्कुलजवळ, मुंबई उपनगर, महाराष्ट्र - ४०००९७. ईमेलः cirp.viksit@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	२२ डिसेंबर, २०२३
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उपकलम (६ए) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास.	वर्गा(र्गां)चे नावः लागू नाही
१३.	वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गातील तीन नावे)	लागू नाही.
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः	वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी **दि. ८ डिसेंबर, २०२३** रोजी **मे. विकसित इंजिनियरिंग लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले.

मे. विकसित इंजिनियरिंग लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. २२ डिसेंबर, २०२३** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे (वर्ग नमूद करावा) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
दिनांकः ०९ डिसेंबर, २०२३
ठिकाणः मुंबई

दिनेश कुमार देवरा
अंतरिम ठराव व्यावसायिक
विकसित इंजिनियरिंग लिमिटेड

जाहीर सूचना

जनतेच्या माहितीकरिता सर्व संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येते की, दिवंगत **श्री. दिवालीबेन भिकाभाई चावडा** या खोली क्र. १, तळमजला, **तन्वी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**, २७२, पी. एम. रोड, कंकुवाडी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ९ अन्वये समाविष्ट २ भाग क्र. ४१ ते ४५ (दोन्ही समाविष्ट) (यापश्चात एकत्रितरित्या **'सदर मालमत्ता'** असे उल्लेखित) चे संपूर्ण आणि निःसंशक मालक होत्या. सदर **श्रीमती दिवालीबेन बी. चावडा** यांचे दि. **०३.०१.२०१६** रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात **(i)** त्यांचा मुलगा, **श्री. दिनेश भिकाभाई चावडा** आणि **(ii)** त्यांचे नातू, **श्री. हेमंत गोयल**, हे त्यांचे केवळ कायदेशीर वारस आहेत.

सदर मालमत्तेमध्ये दिवंगत व्यक्तीच्या हक्कांच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, म्युनिमेन्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखभाल, वहिवाट, योजना, मृत्युपत्र किंवा बोजा या मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत संस्थेस खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१५** दिवसांच्या आत सूचित करावे. वर विहीत केलेल्या कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंधांबाबत संस्थेच्या उप-विधी अंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास दावे/ आक्षेप, जर असल्यास, संस्थेस प्राप्त झाल्यास त्याबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार केला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधीची प्रत दावेदार / आक्षेपदारांना पाहण्याकरिता संस्थेच्या कार्यालयात/ संस्थेच्या सचिवाकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीपर्यंत **स. १०.०० ते रात्री ०८.००** या दरम्यान उपलब्ध असेल.

ठिकाणः मुंबई **दिनांकः १०.१२.२०२३**

तन्वी को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि.
करिता आणि त्यांच्या वतीने
सही/- **मान. सचिव,**
२७२, पी. एम. रोड, कुंकुवाडी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.

दि वीरशैव को-ऑप बँक लि.मुंबई
(अवसायनात)

जाहीर नोटीस

दि. ०३.०२.२०१४ रोजी बँकेचे ठेवीदार यांना दैनिक नवाकाळ वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करून बँक अवसायनात गेल्याचे सुचित करण्यात आले होते.बँकेच्या एक लाखापर्यंतच्या (बचत/मुदत/आवर्त ठेव) ठेवीदारांना बँकेतर्फे ठेव रक्कम परत घेण्यासाठी पुनश्चः आवाहन करण्यात येत आहे. बँकेच्या समापनाची कार्यवाही जलद व मुदतीत पुर्ण करावयाची आहे. सबब एक लाखाच्या आतील ठेवीदारांनी ४५ दिवसाच्या आत बँकेकडे त्यांच्या बचत/ मुदत/आवर्त ठेव या ठेवीचे कागदपत्र-पुराव्यासह बँकेकडे वरिल दिलेल्या पत्त्यावर जमा करावे. ठेवीदारांच्या केवायसी नॉर्म्सची पुरेपुर खात्री झाल्यानंतरच रक्कम ठेवीदारास अदा करण्यात येईल तसेच नमुद मुदतीत ठेवीदारांचे क्लेम (मागणीदावे) प्राप्त न झाल्यास त्यांची क्लेम रक्कम शासनाच्या सरप्लस फंडला जमा करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

दि. १०.१२.२०२३ राम बी कुलकर्णी
ठाणे अवसायक तथा उपनिबंधक
सहकारी संस्था, डोंबिवली.
दि वीरशैव को.ऑप.बँक लि. मूंबइ
(अवसायनात)

● TO STRENGTHEN INFRA BUSINESS

Adani Group rejigs management of its infrastructure cos

Bimal Dayal new CEO of Adani Infrastructure India



RAJESH KURUP
Mumbai, December 9

THE ADANI GROUP has restructured the top management of its infrastructure companies, including appointing Bimal Dayal as CEO of Adani Infrastructure India (AIIL).

Further, Kandarp Patel, now a director with Adani Electricity Mumbai (AEML), has been given charge of all verticals of Adani Energy Solutions (AESL). Previously, Dayal was the CEO of AESL.

In his new role, Dayal will oversee the implementation of infrastructure projects across thermal, renewable energy and green hydrogen. Anil Sardana would continue as the MD of AESL. The changes are to strengthen the infrastructure business and grow it at more than 15% per annum, the group said.

AESL is the country's largest private transmission company, with a presence across 14 states and a cumulative transmission network of 20,000 circuit km and 53,000 megavolt-ampere transformation capacity.

The Adani Group's infrastructure companies had earlier announced investment of more than ₹7 trillion over the next decade to consolidate its position as the largest infrastructure player in India.

IndiGrid raises ₹670 cr via institutional placement

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, December 9

INFRASTRUCTURE INVESTMENT TRUST IndiGrid has raised ₹670 crore through institutional placement.

IndiGrid, India's first publicly listed power sector Infrastructure Investment Trust (InvIT) has successfully raised ₹670 crore through an Institutional Placement process as laid out by SEBI, a statement said.

According to the statement, the IP process, launched on December 5, 2023, saw strong demand from both existing and new Indian and global institutional investors.

In September 2023, IndiGrid had raised over ₹400 crore through a preferential issue. With the recently concluded Institutional Placement, the company has successfully raised equity funds of ₹1,070 crore in FY2023-24.

"This fundraise has helped us expand our unit holder base with more than 90% demand from long-term investors across insurance companies, pension funds, mutuals funds and domestic institutions to IndiGrid's investor base," Harsh Shah, chief executive officer of IndiGrid, said in the statement.

Proceeds from the recently concluded Institutional Placement and those from the preferential allotment would be used for paring down debt.

"With the capital raise, IndiGrid has created a significant debt headroom of around ₹6,000-7,000 crore at the leverage cap of 70%," the statement said. The board of directors of IndiGrid Investment Managers Ltd, acting in the capacity of investment manager of IndiGrid, approved the issuance and allotment of 52.7 million new units through this Institutional Placement to 11 eligible investors on December 8, 2023. More than 90% of incremental units were issued to insurance companies, mutual funds, pension funds and domestic institutions.

Axis Capital Limited, Ambit Private Limited, HSBC Securities and Capital Markets (India), and SBI Capital Markets served as Book Running Lead Managers for this placement. Cyril Amarchand Mangaldas (CAM) and S&R Associates acted as issuer counsel and bankers counsel respectively.

Sunak's officials in Delhi to discuss India-UK FTA

PRESS TRUST OF INDIA
London, December 9

SENIOR OFFICIALS FROM British PM Rishi Sunak's team are in New Delhi this week to add momentum behind the ongoing round of negotiations for an India-UK free trade agreement (FTA), according to a UK media report on Saturday.

The Guardian newspaper reports that while there is no official comment from either side on such a visit, Prime Minister Narendra Modi-led government is keen to finalise the FTA by the end of February before Sunak sets off on an expected general election campaign trail.

Both countries are heading into an election year in 2024 and signing off on a trade agreement with India will bolster Sunak's electoral pitch to voters showing signs of anti-incumbency towards his governing Conservatives.

"The deal is still very much on and we think it is possible before both countries have their elections. Both sides are keen to get this done," an official close to the talks told the newspaper.

Corporates pitch in for Chennai flood-hit

FE BUREAU
Chennai, December 9

TVS MOTOR COMPANY has donated ₹3 crore to the Chief Minister's Relief Fund in the wake of the flooding and damage caused by cyclone Michaung in Tamil Nadu.

TVS Motor is committed to helping the displaced rebuild their lives and to support the immediate relief and rehabilitation work being done by the government, the company said.

Sudarshan Venu, MD, TVS Motor said :"The floods have unleashed severe hardship on the community, and we would like to do our part to support the community. This will augment the tireless efforts of the government and the resilient people of Tamil Nadu to restore normalcy." TVS Motor will also offer additional service support for its customers in the flood hit districts of Tamil Nadu.

Ashok Leyland, the Indian flagship of the Hinduja Group and the country's leading commercial vehicle manufacturer donated ₹3 crore to Tamil Nadu Chief Minister Relief Fund towards relief work and humanitarian aid for the flood-affected areas.

Suzuki Motorcycle launches campaign

TWO-WHEELER MANUFACTURER Suzuki Motorcycle has rolled out free service support to flood-affected customers in Chennai and neighbouring districts, the company said. This is aimed at reducing financial impact of vehicle repairs faced by affected residents.

The company said it has activated dealer networks in Chennai, Chengalpattu, Kancheepuram and Tiruvallur to assist customers with free comprehensive checkups. **PTI**

Nissan Motor rolls out service support to customers

JAPANESE AUTOMAKER NISSAN Motor has announced a comprehensive package of support services to customers impacted by cyclone Michaung, the company said on Saturday. Nissan Motor India said it has set up a special help desk and contact call centre to assist the flood-affected customers.

The company has also launched free towing vehicle support, claims filing assistance, and special offers on floor carpet replacement, among others, a company statement said. The workshops in Chennai would be operated at extended hours to serve the customers and a 10% discount has also been offered on engine oil and oil filter replacement, the company added. **—PTI**

Bank of Baroda

www.bankofbaroda.in

E-AUCTION SALE NOTICE

Bank of Baroda invites offer for sale of various residential properties at different locations in India by holding e-Auction

Bank of Baroda proposes to hold e-Auction for sale of its various properties.

Complete details of the properties, terms of e-Auction & all other information in this regard are provided in the bank's website **www.bankofbaroda.in**.

All the Properties mentioned in the advertisement shall be disposed-off on **"As is Where is & whatever it is"** basis.

For any further Clarification/Query/Assistance, Please Contact on the below mentioned numbers

1) **For Sl. No. 1 to 7 : +91 99205 25830**
   E-Mail- mrunal.duggar@anarock.com & pd.em.bcc@bankofbaroda.co.in
2) **For Sl. No. 8 : 022 – 6698 5476/6845 8701**
   E- Mail - pd.em.bcc@bankofbaroda.co.in

Any Addendum/Corrigendum including modifications if any shall be issued on the bank's website

Last date of EMD & KYC Document Submission is 01/01/2024 upto 03:00 PM

Date and Time of Opening of the Technical bid (EMD & KYC Docs): 01/01/2024 at 03:30 PM

Date & Time of e-Auction 04/01/2024 from 11:00 AM to 01:00 PM with unlimited extension of 5 minutes each.

Place: Mumbai
Date: 10.12.2023

GM & Head,
FM, PD, COA & RDP

104/23-24

